# जिद्दीची लोभस रूपं








'जिद्दीची लोभस रूपं'
या पुस्तकातून
आपल्याला भेटणार आहेत
प्रतिकूल परिस्थितीतही
शिक्षणाची आस असणारी,
त्यासाठी धडपड करणारी छोटी मुलं.
अन् अशा अवघड वाटेने जाताना,
पदरी अनुभवांची शिदोरी बांधत
अर्थपूर्ण जीवन जगणारी
मोठी माणसंही !

स्पर्धा, यश, कीर्ती, पैसा
हे परवलीचे शब्द असणाऱ्या
आजच्या काळात त्यांच्या
प्रखर प्रयत्नांचे महत्त्व
वेगळेपणाने सांगणारे हे लेख !
कुठे त्यांच्याच शब्दात
तर कुठे मित्रांच्या शब्दांत !

ही कुणी प्रसिद्धी पावलेली,
नावाजलेली माणसं नाहीत.
ही आहेत सर्वसामान्य माणसं,
आपल्या आजुबाजूलाच जगणारी.
आपल्यातलीच; पण आगळीवेगळी.
प्रखर इच्छाशक्ती असलेली,
सशक्त मनाची,विलक्षण जिद्दीची !

जीवनोत्साहाचं हे अनोखं दर्शन
कुमार वाचकांनीच नव्हे तर
मोठ्यांनीही अनुभवावं असं !

**प्रेरक कहाण्या**
छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
किंमत ₹ १५०
jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

**संपादन**
बागेश्री पोंक्षे

# जिद्दीची लोभस रूपं



**छात्र प्रबोधन**
**ज्ञान प्रबोधिनी**
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३०

**जिद्दीची लोभस रूपं**

('छात्र प्रबोधन' मधील निवडक अनुभवपर प्रेरक कहाण्यांचा संग्रह)


**प्रकाशक व मुद्रक :**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, 'छात्र प्रबोधन', ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०.
दूरभाष - (०२०) २४२०७ १७४/१७९
ई-मेल - chhatraprabodhan@ jnanaprabodhini.org



© स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन



**अक्षर जुळणी :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे

**मुखपृष्ठ व अंतर्गत सजावट**
श्री. भास्कर सगर

**आतील चित्रे**
श्री. भास्कर सगर, श्री. गिरीश सहस्रबुद्धे

**आवृत्ती**
**प्रथम** : सौर श्रावण, शके १९२६ (ऑगस्ट २००४)
**द्वितीय** : सौर मार्गशीर्ष, शके १९२९ (डिसेंबर२००७)
**तिसरी** : सौर आषाढ, शके १९३५ (जुलै २०१३)
**चौथी** : सौर भाद्रपद, शके १९४४ (सप्टेंबर २०२२)

**वितरण**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०
ऑनलाइन खरेदीसाठी www.jpprakashane.org

**किंमत : रु.**१५०/-

***Jiddichi Lobhas Rup'***
**(Collection of Pre-published Stories from Chhatra Prabodhan Magazine for Youngsters published by Jnana Prabodhini )**

# प्रस्तावना

**विघ्नैः पुन:पुनरपि प्रतिहन्यमाना: ।**
**प्रारब्धम् उत्तमजना न परित्यजन्ति ।।**

असा कवी भर्तृहरीचा प्रसिद्ध श्लोक आहे. त्याचा मथितार्थ असा, की वारंवार संकटे आली तरी जे हाती घेतलेले असते ते अजिबात सोडून न देण्याचा गुण गुणिजनांमध्ये असतो.

या श्लोकाचा अर्थ करताना(कवीला अभिप्रेत नसलेला)एक इब्लिसपणा आम्ही कधीकधी करायचो. तो असा, की 'प्रारब्ध' म्हणजे 'दैव'हे काही संकटांमुळे बदलत नाही. तुमच्या नशिबातच असलं तर कितीही अडचणी आल्या तरी घडायचं ते घडणारच.

या दोन अर्थांमध्ये मनुष्यघडणीच्या तत्त्वज्ञानाची दोन टोकं दिसतात. पहिल्यात माणूस स्वत:च्या चिकाटीने घडतो, असा प्रयत्नवादी अर्थ आहे; तर दुसऱ्यात नशीबच तसं असतं म्हणून तो घडतो, असा दैववादी सूर आहे. पारंपरिक भारतीय मन दुसऱ्या अर्थाकडे झुकणारं असतं. माणूस स्वत:च्या धडपडीने यशस्वी होऊ शकतो, हे स्वीकारायला आपण सहजी तयार नसतो.

धडपड शब्द कसा तयार झाला ते पाहण्यासारखं आहे. हा शब्द 'धरपड' या शब्दाचा अपभ्रंश आहे. अर्थ असा की पडला तरी तो माणूस पुनश्च कशालातरी धरतो आणि उठतोच. ही धरून ठेवण्याची--चिवटपणाची प्रक्रियाच 'धडपड' शब्दातून व्यक्त होत असते. मी यशस्वी होणारच. 'ठेविले अनंते तैसे का रहावे? चित्ती कशासाठी समाधान?' असा सवाल विचारणारी ही प्रक्रिया आहे.

प्राप्त परिस्थितीची प्रतिक्रिया आल्याशिवाय, घृणा आल्याविना माणूस स्थित्यंतरासाठी सर्वस्व पणाला लावीत नाही; म्हणूनच त्याला प्रथम त्याच्या सद्य:स्थितीबद्दलचा असंतोष शिकवावा लागतो. ज्याच्या मनी असा असंतोष आला, तो धडपडून उठतो, वाटचाल करतो आणि जिथे जायचे तिथे जातोच.

कित्येकांना आपल्या परिस्थितीचा असा चिकित्सक विचार करायचे सुचत नाही. आपण असेच राहणार, तेच आपल्या नशिबी आहे. आपणच नव्हे, तर सगळेच अशा अडचणीत आहेत, अशी स्वत:ची समजूत करून घेणारेच फार.

समाजात यशस्वी माणसांची उदाहरणे काही कमी नाहीत; पण माणसे या उदाहरणांकडे कशी पाहतात? तर आपण जसे आभाळातल्या चंद्राकडे पाहतो तसे पाहतात. चंद्राकडे पाहून बरे वाटते हे खरे; पण 'आपण त्याच्यासमान व्हावे' हा बोध काही होत नाही; कारण हा चंद्र दूरचा आहे. त्याचे अनुकरण करण्याचा प्रश्नच

येत नाही. खरे तर अशा दूरच्या उदाहरणांचा आपल्याला काही उपयोग नाही.

आपल्याला अशी उदाहरणे हवीत की, जी प्रयत्नावरचा आपला विश्वास वाढवतील. असं मलाही जमेल, असं वाटायला लावू शकतील; म्हणून ही यशाची उदाहरणं तुमच्या आमच्यातली, सहजसाध्य वाटली पाहिजेत. 'जिद्दीची लोभस रूपं' या पुस्तकातली एकूणएक उदाहरणं ही अशी तुमच्या आमच्यातली आहेत. त्यातल्या कुणाचीही सत्यकथा वाचून तो लोकोत्तर, अपवाद होता म्हणून यशस्वी झाला, सगळ्यांना कुठून असं जमायला, असा निष्कर्ष काढता येणार नाही. अन्यथा लोक कुणाचे कौतुक करताना त्याला अशा दैवी मखरात बसवून त्याच्याशी आपली नाळ तोडतात. तो केवळ अभिमानाचा विषय होतो, अनुकरणाचा नाही.

माणसाला एका पिढीत मोठी उंची गाठायची असेल तर त्याला ती केवळ योग्य शिक्षणानेच गाठता येईल. उद्योग, व्यवसाय, व्यापार, शेती या सर्वांनी येणारी भरभराट त्यामानाने खूप सावकाशीने स्थित्यंतर घडवीत असते. या पुस्तकातली बहुसंख्य उदाहरणे अशा शैक्षणिक पराक्रमाची आहेत. सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, शाहू महाराज अशा महनीय पूर्वजांनी त्यांची आयुष्ये चंदनासारखी झिजवली. त्या सुगंधाचाच दरवळ आपल्याला सार्वत्रिक शिक्षणाच्या रूपाने लाभला आहे, याची जाणीव या उदाहरणांतून होते. ज्या शासनाने दूरस्थ अंतर्भागातही प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पोहोचवले, त्याच्याच कृपेने ही दुर्गम भागातली मुलंदेखील गुणांचे उच्चांक करीत, काहीना काही करून दाखवत आहेत, असे म्हटले पाहिजे. आयुष्याला शिक्षणाची जोड मिळताच हा जो क्रांतिकारी बदल माणसाच्या परिस्थितीत आणि मन:स्थितीत होतो तो दुसऱ्या कशानेही होत नाही.

शिक्षणाचे महत्त्व या दृष्टीने अनन्यसाधारण आहे. तथापि हे जे शिक्षण आहे, तेही सर्वांना सहजपणे उपलब्ध आहे का ते पाहिले पाहिजे. या पुस्तकातील कित्येक उदाहरणे सांगतील की आर्थिक आणि सामाजिक अडसर अजूनही अनेकांना शिक्षणापासून वंचित ठेवीत आहेत. 'मला लई शिकायचंय अजून' असं कळवळून म्हणणारी साखरशाळेतली अनिता सानप तेराव्या वर्षी होऊ घातलेल्या लग्नामुळे पुढे शिकू शकणार नाही. यमगरवाडीच्या पारधी शाळेतला रमाकांत वडिलांनी चोरी करून आणलेल्या वस्तूंचा आधार घेऊन शिकू इच्छित नाही. रोज २०-२५ किलोमीटरचे सायकलिंग करणारा आणि रात्री दीडपर्यंत जागून अभ्यास करणारा योगेश वग्गू, त्याचा सर्व वेळ शिक्षणासाठी देऊ शकत नाही; कारण नोकरी करणे त्याला आवश्यकच आहे. औरंगाबादच्या निशाची घरकामवाली आई निशाला पॉलिटेक्निकला घालू शकत नाही; कारण निशाच्या

पाठची दोन भावंडं वाढवायचीत. 'गरिबाला हे शिकन्याचे चोचले परवडतात का?' हा तिचा प्रश्न काळीज चिरीत जाणारा आहे.

शिक्षण सार्वत्रिक झालंय आपण म्हणतो; पण ते प्राथमिक अथवा फारतर माध्यमिक स्तरावरचं शिक्षण. इथपर्यंत शिकणं हे केवळ साक्षरतेच्या टप्प्यापर्यंतचं आहे. त्यानं माणूस पोटापाण्याला नाही लागू शकत. तिथून पुढचं शिक्षण एकतर सगळीकडे उपलब्ध नाही आणि दुसरं म्हणजे ते सर्वांना परवडणारंही नाही. त्याहूनही गंभीर गोष्ट अशी की या निर्णायक टप्प्यात मी कोणते शिक्षण निवडावे हे सांगणारंही कुणी या वर्गाला उपलब्ध नाही.

निव्वळ पदवीधर होणं हेदेखील ज्या स्तरातल्या मुलांच्या दृष्टीने पराक्रमाचं आहे, त्यांना तू कोणत्या शाखेत वा विषयात पदवीधर व्हावंस, ते सांगणारं आणि त्यासाठी आवश्यक ते साहाय्य देणारं माणूस पाठीशी पाहिजे. आजकाल सुशिक्षित, पदवीधर बेकार प्रचंड संख्येने दिसतात ते मुख्यत: नेमकं मार्गदर्शन न मिळालेल्या या अशा वर्गातील आहेत. शिवाय पोटापाण्याला लावू शकणारी विद्या मिळणं ही ज्याची आर्थिक गरज आहे, त्यांना वेळीच उपयुक्त कौशल्य वा ज्ञानाचा आधार देणारे व्यावहारिक कोर्सेस सुचवणं फार गरजेचं आहे. यमगरवाडीच्या तोतऱ्या सुनीलनं एक मोठं शैक्षणिक सूत्र सांगितलं आहे, 'कोन मूर्त्या बनवंल.. कोन लाकडाचं करेल. समद्यांना त्ये शिक्षण नको. समद्यांचं डोकं त्यात नाय चालत. लगेच काम मिळालं पाहिजे.' सुनील या पारधी मुलाला असं जीवनाचं आनंददायी शिक्षण देणारे गिरीश प्रभुणे लाभले; पण असे कितीतरी मुके सुनील गावोगावी गोंधळलेल्या अवस्थेत जागीच खिळून आहेत किंवा कुठेच न नेणाऱ्या वाटेनं जाण्यात उमेदीचं वय वाया घालवत आहेत.

शिक्षणाच्या स्वरूपाबाबतही विचार होणं गरजेचं आहे. जे शिक्षण विद्यार्थ्याला त्याच्या परंपरागत श्रम व कारागिरीच्या क्षमतेचा उपयोग सुचवीत नाही; त्याला त्याच्या ग्रामीण परिसरात उपयोगी पडणारं काहीही देत नाही आणि सब घोडे बारा टक्के पद्धतीनं शहरी, ग्रामीण, सर्वच विद्यार्थ्यांना एकच शहराभिमुख, पुस्तकी वळण देतं ते फारच बेजबाबदारपणे योजलेलं वाटतं. शाळेनं ग्रामीण पर्यावरणातून मुलं उचलली आणि शहरी स्पर्धेत रुजवली मात्र नाहीत तर तो केवढा घोर अपव्यय ठरेल?

वरील सर्व अडचणींवर जिद्दीने मात करीत वाटचाल करणाऱ्या कितीक मुलामुलींच्या स्फूर्तिदायी कथा या संग्रहात समाविष्ट आहेत. या मुलांनी त्यांच्या पराक्रमाने अनेक प्रकारची कोंडी फोडून यश मिळवलेलं आहे.

या मुलांपुढे अनुकरण करण्यासारखा कुठलाही जवळचा नमुना नसतो.

मी अमक्यातमक्यासारखा होईन असं म्हणतच मुलं प्रगती करू शकतात; पण जवळपास असा कोणीच 'आपल्यातला' नमुना नसताना हे काम फारच अवघड होते. अडचणींचा असा मोठा कडा चढून आलेल्या मुलांना सर्व साधारण स्पर्धेच्या नियमांनी जोखणं खरं तर अन्यायाचं आहे; पण आधुनिक जागतिकीकरणाच्या आजच्या युगात 'स्पर्धेत सरशी' एवढा एकच यशाचा निकष लावला जातो. ही विषम स्पर्धा पचवूनदेखील जी मुलं यशस्वी होताना दिसतात त्यांच्या यशाला एक वेगळीच झळाळी प्राप्त होत असते.

या मुलांची पहिली कोंडी समाजाने जे पारंपरिक शिक्के मारलेले असतात त्यांनी होत असते. आपण पूर्वापार असं ठरवूनच ठेवलेलं आहे की पारध्याच्या मुलाला शब्दनिष्ठ लेखी परीक्षेतून पार जाता येत नसेल तर त्यानं शिकण्याची जिद्द धरावीच कशाला? मोलकरणीच्या मुलींनी मोलकरणी व्हायचं सोडून शिकायची जिद्द धरावीच का म्हणून? अशा 'का' या प्रश्नाला या मुलांनी 'का नाही?' असा प्रतिप्रश्न विचारून पहिली कोंडी फोडली आहे. त्या त्या प्रत्येक प्रकारच्या परिस्थितीतले पहिले यशस्वी नमुने त्यांनी उभे केले आहेत. आता पुढच्यांना त्यांचे अनुकरण करण्याचे तुलनेने सोपे काम उरलेले आहे.

दुसरी कोंडी मुलांच्या पालकांमुळे होत असते. परिस्थितीचे असह्य चटके खाल्लेली ती मागच्या पिढीतली जखमी माणसं आपल्या पिल्लांना जरासे उजवे दिवस आले तरी इतकी अल्पतुष्ट होतात की, चिखलीच्या दिनेशच्या आईसारखी मुलखावेगळी मातु:श्री विरळाच. पाबळला शिकायला गेलेल्या दिनेशला वडिलांच्या वर्षश्राद्धासाठी कशाला बोलवायचं? 'अभ्यास बुडेल नाय काय?' असे विचार करू शकणारी एखादीच; म्हणूनच तर तिचा दिनेश म्हणतो, ''माझ्याकडे पाहून मुलांचा शिक्षणावर विश्वास बसेल?'' पालकांनी कल्पनाही केली नसेल अशा उंच क्षितिजापर्यंत भरारी घेण्याचं वेड या मुलांमध्ये ठायीठायी दिसतं.

तिसरी कोंडी स्वत:च न्यूनगंड बाळगण्याची असू शकते. 'रानातली कितीतरी सुंदर फुलं आपणहून उमलतात, निसर्गाला तोंड देत उमलतात.' असं रेणुताई दांडेकरांनी लिहिलंय. निसर्गाला तोंड तर द्यावं लागतंच त्यांना; पण आधी स्वत: स्वत:ला तोंड द्यावं लागतं. मनात धाकधूक असली तर झेप घेता येत नाही. ज्यांना प्रचंड आत्मविश्वास असतो त्यांच्याकडूनच चमत्कार घडू शकतात; पण आपला आपल्यावर विश्वास बसावा कसा? सारी परिस्थिती आणि सहकारी, 'तुला कसं जमणार नाही.' हेच सांगण्यात धन्यता मानीत असताना, 'जमणारच मला' असं स्वत:ला बजावायला विलक्षण बळ लागतं. 'प्रयत्न केल्याशिवाय

कसं कळेल मला डॉक्टर होणं जमेल का नाही ते?' असं म्हणणारा अंध डेव्हिड हार्टमन फार जणांना वाट दाखवून जातो. 'आपली तुलना इतरांशी करण्यापेक्षा ती स्वत:च्याच मागील वर्षातील प्रगतीशी करायला हवी.' असं म्हणणारा प्रमोद बाळू पाटील ही कोंडी फोडण्याचं सूत्रच जणू सांगत असतो!

या अनंत अडचणीतून सावरणाऱ्या प्रत्येकाची कथा ही विलक्षण प्रेरणा देणारी आहे. मी तर असे म्हणेन की 'अडचण' नावाची शिक्षिका ज्याला भेटली त्याला यश हमखास मिळणार असे गृहीत धरावे. आपली दारिद्र्याची पार्श्वभूमी कित्येकांना जागीच थिजवून ठेवीत असली तरी अनेकांना विलक्षण जिद्द व प्रेरणाच देत असते. साधनसंपत्तीचा असा अभाव किंवा लयलूट ही माणसाच्या प्रेरणा थिजण्याची सबब होऊ शकत नाहीच. कोणत्याही परिस्थितीत जिगरी माणूस यशाकडेच झेप घेतो.

आपल्या मुलांनी शिकावेच यासाठी कंबर कसून झुंजणाऱ्या कितीतरी चांदबिबी आजूबाजूला दिसतील. त्या मानाने दारिद्र्याने पिचलेला पुरुष ती सबब वापरून व्यसनी बनलेला दिसतो, तर त्याची बायको मात्र चौफेर लढाई करीत मुलांना प्रेरणा देताना दिसते. स्त्रीची ही भारावून टाकणारी भूमिका हे नव्या पिढीचं मोठं आशास्थान आहे. नवनाथची आई पारूबाई चौदा घरची कामं करून त्याला शिकवत असते. म्हणूनच तो रस्त्यावरच्या ट्यूबलाइटमध्ये बसून रात्री एकदीडपर्यंत अभ्यास करण्याची आगरकरी साधना करीत असताना दिसतो. या प्रकारातल्या बहुतांश मुलांचे बाप, भाऊ हे व्यसनी झालेले, निर्लज्जपणे आळस करणारे असताना, किंबहुना तसे असल्यानेच ही मुले चिखलातल्या कमळासारखी स्वच्छ, सुगंधी बनतात.

या मुलांना ही जिद्द कुणी शिकवली? सुदैवाने समाजात अशी अनेक सहृदय माणसं आहेत की ज्यांना अशी अनंत फुले फुलावीत याचं वेड आहे. या देवदूतांचा तुटवडा या समाजाला कधीही पडू नये. कोकणातल्या चिखलीकडे राहून लोकमान्यांच्या जन्मगावी कर्मयोग आचरणारे राजा दांडेकर, रेणू दांडेकर, पुण्याच्या पूर्वभागातील झोपडपट्ट्यांतून गुणी मुलांना हुडकून त्यांच्या आयुष्याला उजाळा देणारे स्व. किशाभाऊ पटवर्धन, उस्मानाबादकडच्या यमगरवाडीतले पारधी हे आपले भाऊबंद मानून त्यांच्या पुढच्या पिढीचे वळण बदलवणारे गिरीश प्रभुणे, खेडोपाडीची गुणी मुलं आपलीच मानून त्यांच्याकरवी लोकोत्तर पराक्रम घडवणारे स्व. अप्पासाहेब पेंडसे; पाबळचे स्व. डॉ. कलबाग, साखरशाळांचे सेवाभावी शिक्षक – एक ना अनेक माणसं या उपेक्षित भारताच्या उत्कर्षाला हातभार लावीत आहेत. साध्या शिक्षिका वा गृहिणीदेखील आपल्या अंत:करणातला कळवळा कृतीत उतरवून एकेक आयुष्य उभं करू शकताना

दिसत आहेत. आदिवासी, अपंग, ग्रामीण अशा सर्वच क्षेत्रात या मुलखावेगळ्या माणसांनी एक पुण्यकार्य चालवलेलं दिसत आहे.

अशा सहृदय माणसांबद्दलची कृतज्ञता यातील बहुतेक मुलांत आणि त्यांच्या पालकांमध्ये दिसते आहे. कृतज्ञतेएवढी मधुर भावना दुसरी नाही. धावत्या गाडीच्या टायरखाली चेपलेल्या भाकरीच्या पिठाला माझ्या आईच्या हातचा मायेचा घाम होता अशी जाण असणारा मुलगा तो भाकरीचा तुकडा रस्त्यात टाकून देत नाही, अतिशय कृतज्ञतेने ओठाला लावतो. आपल्या मुलाचं – रघूचं – शिक्षण करणाऱ्या कार्यकर्तीला मायेनं जवळचा खाऊ देऊन 'तू खा. तुझे लाड कोण करणार' असं म्हणणारी रघूची आजी हीच जाणीव व्यक्त करीत असते. स्वरूपवर्धिनीमुळे शिकून इंजिनियर झालेला जिन्याखालचा सुरेंद्र आपल्यासारख्या अडल्या मुलांसाठी पहिल्या पगाराचे पैसे स्वरूपवर्धिनीत आणून सोपवतो; ही कृतज्ञतेची भावनाच.

अर्थात अशा धडपडणाऱ्या मुलांसाठी स्वेच्छेने कामं करणारी ही कळवळ्याची माणसं काही कृतज्ञतेची अपेक्षा बाळगीत नाहीत. त्यांना एवढंच हवं असतं की, 'आपल्यामुळे घडलेला मुलगा आपमतलबी होऊ नये. तोदेखील चार जणांना आधार व्हावा.' 'ज्यासी आपंगिता नाही' अशांना हृदयासी धरण्याचा बाणा समाजात रुजावा!

जिद्दीच्या एकूण एक कथा अशा समाजमानस बदलवणाऱ्या आहेत. त्या वाचताना, ऐकताना, अनुभवताना डोळ्यांतून आसवं झरू लागतात. कौतुकानं आणि अभिमानानं छाती भरून येते. परिस्थितीवर मात करता येऊ शकते याचा विश्वास निर्माण होतो. त्यासाठी निदिध्यास, रात्रंदिवस मेहनत, उत्साह आणि आनंद, आपल्यासाठी झटणाऱ्यांच्या कष्टांची कृतज्ञ जाणीव, प्रयत्नवादी एकाग्रता आणि विविध पाकळ्यांनी उमलण्याची आस असे गुण अंगी बाणवण्याचे महत्त्व पटते.

या धडपडणाऱ्या जिद्दी मुलांपासून समाजाने आणि आपल्या देशानेही शिकण्यासारखे खूप काही आहे. त्यांच्यासारखेच आपल्या या देशाला 'थर्ड वर्ल्ड' या नावाने खिजवले जाते, संधी नाकारली जाते, प्रबळांशी स्पर्धा करूनच जगावे लागते. ही गुणी मुले कुणाबद्दलही तक्रार न करता जिद्दीने अथक परिश्रम करून अपूर्व यश मिळवतात. आपला देश मात्र संसाधनांची कमतरता, अशिक्षितपणा आणि लोकसंख्येचा बोजा या व असल्या अनेक सबबी वापरतो आणि जणू आपल्या मागासलेपणाचे समर्थन कुरवाळीत बसतो आहे. आपल्याच चिवट नव्या पिढीपासून शिकण्यासारखे या देशाला खूप काही आहे. 'जिद्दीची लोभस रूपं' हे पुस्तक या दृष्टीने फारच मोठ्या स्तरावर उपयुक्त ठरणार आहे यदर्थी संशयो नाही.

**– राम डिंबळे**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | ते अश्रू होते आनंदाचेच!! | हिमा दास | १५ |
| २. | श्रमसाफल्य | सुषमा निसळ | १९ |
| ३. | जाण | बागेश्री पोंक्षे | २३ |
| ४. | ताई, मला शिकायचंय! | कु. अनिता सानप | २७ |
| ५. | असाही एक अनुभव | सुवर्णा गोंधळेकर-गोखले | ३० |
| ६. | नवी वाट | रेणू दांडेकर | ३३ |
| ७. | स्वप्नांचा पाठपुरावा करताना... | चंदा उडनशिवे | ३६ |
| ८. | जीवन त्यांना कळले हो...! | गिरीश प्रभुणे | ४० |
| ९. | भरारी 'कश्मिरा'ची | विनया देसाई | ४७ |
| १०. | एका जटायूची झेप | डॉ. अनुराधा औरंगाबादकर | ५० |
| ११. | अनंत ज्यांची ध्येयासक्ती | शैलजा देशमुख | ५४ |
| १२. | माझी चांदबिबी | संजीवनी बोकील | ५९ |
| १३. | दिशा झाल्या झुंजूमुंजू... | श्रीकांत गबाले | ६४ |
| १४. | हसत दुःखाचा केला मी स्वीकार | राजश्री काळे | ६९ |
| १५. | सूर गवसला | संजय उपाध्ये | ७४ |
| १६. | आत्मनिर्भरतेसाठीची वाटचाल | इंदुमती जोंधळे | ७९ |
| १७. | तिमिराकडून तेजाकडे | रामदास म्हात्रे | ८४ |
| १८. | वेदनेने दिले भवितव्याचे स्वप्न | नसीमा हूरजूक | ८९ |
| १९. | भाकरीने मला घडविले! | विश्वास कचरे | ९५ |
| २०. | ग्रामे ग्रामे रत्नसंपदा | राम डिंबळे | १०० |
| २१. | शिक्षणासाठी दाही दिशा | डॉ. द. ता. भोसले | १०८ |
| २२. | वेदनेतून फुलले गाणे | मृणालिनी चितळे | ११६ |
| २३. | चिकाटी व विश्वासातून यशाकडे... | डॉ. चित्तरंजन याज्ञिक | १२१ |
| २४. | सकारात्मक दृष्टिकोन असलेले उद्योजक श्री. भावेश भाटिया | श्रीकांत कुलकर्णी | १२५ |